Impact Factor: 6.017

ISSN: 2278-9529

# GALAXY

## International Multidisciplinary Research Journal

Peer-Reviewed e-Journal

Vol.15, Issue- 1 January 2026

**15 Years of Open Access**

Editor-In-Chief: Dr. Vishwanath Bite

Managing Editor: Dr. Madhuri Bite

www.galaxyimrj.com

# महाराष्ट्रातील नैसर्गिक वारसा स्थळ पश्चिम घाट तथा सह्याद्री: एक दृष्टीक्षेप

प्रा. डॉ. सिसोदिया प्रदीप बन्सीधर
श्री दत्त कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय,
हदगाव जिल्हा नांदेड.

भारताला समृद्ध प्राचीन परंपरा, नैसर्गिक व सांस्कृतिक वारसा लाभलेला आहे. पर्यटकांसाठी विविध प्रकारची पर्यटन स्थळे असणारे राज्य असून जैवविविधतेने संपन्न असणारा पश्चिम घाट सुमारे १६०००० चौरस किलोमीटर क्षेत्रफळाचे आहे. जैविक विविधतेसाठी युनेस्कोच्या वारसा स्थळाच्या यादीत समाविष्ट झाले आहे. हिमालय पर्वतापेक्षा जुने जैविक विविधता असलेले हे पश्चिम घाट अद्वितीय जैव भौतिक आणि पर्यावरणीय प्रक्रियांसह प्रचंड महत्त्वाच्या भौमितिक वैशिष्ट्यांचे प्रतिनिधित्व करते. या जंगलात जगातील विषुववृत्तीय नसलेल्या उष्णकटिबंधीय सदाहरित. जैवविविधता विकसित झाली आहे.सह्याद्रीच्या पर्वतरांगा, थंड हवेची ठिकाणे ,अनेक वन्य जीवनाचे अभयारण्य, नद्या, यामुळे समृद्धीत भर पडली आहे . येथील परंपरा संस्कृती ही विविधतेने नटली आहे. महाराष्ट्रात पर्यटनाच्या दृष्टीने जागतिक दर्जाचे स्मारके प्राचीन किले ,वास्तु, गुंफा मंदिरे, जगप्रसिद्ध लेणे, प्राकृतिक सौंदर्य आहे.

ऐतिहासिक वारसा म्हणजे भूतकाळातील अशा घटना, वास्तु स्थापत्य, रूढी, परंपरा, ज्ञान ,कला, ज्या पुढील पिढीसाठी भविष्य काळासाठी उपयुक्त तथा महत्वपूर्ण ठरतात स्मारके, पुरातत्वीय स्थळे, कलाकृती आणि परंपरा, कला, कौशल्य ज्ञान. ऐतिहासिक वारसा आपल्याला पूर्वजांशी आणि संस्कृतीशी जोडतो.UNESCO ही जागतिक संस्था शिक्षण विज्ञान व सांस्कृतिक वारसा जपण्यासाठी कार्यरत आहे. तिच्या World Heritage site यादीत अशाच स्थळांचा समावेश होतो. जे सर्वोत्कृष्ट जागतिक मूल्य दर्शवतात .ही स्थळे

केवळ त्यांच्या देशापुरतीच मर्यादित नसतात. तर मानव जातीचा इतिहासातील त्यांचे स्थान विशिष्ट महत्त्वाचे असते. जागतिक वारसा यादीत एखाद्या ठिकाणाचा समावेश करण्याचा मुख्य उद्देश .म्हणजे त्याचे अस्तित्व वाचवणे जेणेकरून ते दुर्लक्ष किंवा निष्काळजीपणामुळे नष्ट होऊ नये. या स्थळांना जागतिक वारसा म्हणून मान्यता दिल्यानंतर त्याची जतन करणे. त्याची संरक्षण करणे. ही जागतिक स्तरावरची जबाबदारी ठरते..कारण याचे महत्त्व एखाद्या विशिष्ट देशासाठी नसून संपूर्ण मानवजातीसाठी असते.

सांस्कृतिक संघटनेने (युनेस्को) नैसर्गिक आणि सांस्कृतिक वारशाची ओळख, संरक्षण आणि जतन करण्यासाठी त्यांच्या वाटणीत उल्लेखनीय मानवी मूल्याची जाणीव करून दिली आहे.. जुलै 2025 पर्यंत 1248 युनेस्को जागतिक वारसा स्थळ आहेत या स्थळामध्ये सांस्कृतिक, नैसर्गिक, व मिश्रित अशा तीन प्रकारच्या स्थळांचा समावेश आहे सर्वाधिक सांस्कृतिक या प्रकारात 972 स्थळे, नैसर्गिक या प्रकारात 235 स्थळे व मिश्रित या 40 स्थळे आढळतात. युरोप खंडातील इटाली मध्ये जागतिक वारसा स्थळांची संख्या सर्वाधिक आहे 61 व भारतामध्ये हा आकडा 44 आहे. यात 36 सांस्कृतिक स्थळे आहेत. सात नैसर्गिक स्थळे आहेत आणि एक मिश्र प्रकारचे आहे.

महाराष्ट्रातील जागतिक वारसा स्थळ. युनेस्कोच्या संकेतस्थळावर पाहायला मिळतात. यात अजिंठा लेणी, वेरूळची लेणी ,एलिफंटा गुंफा,.मध्ययुगीन रॉक कट कला आणि वास्तुकलाचा भव्य नमुना ,छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस. व्ही. टी. सोबतच मुंबईचे व्हिक्टोरियन गॉथिक आणि आर्ट डेको वास्तुशिल्प. यांचा समावेश होतो. छत्रपती शिवाजी महाराजांचे बारा किल्ले युनेस्को जागतिक वारसा यादीत समाविष्ट झाले आहेत. ही स्थळे मराठा साम्राज्याच्या सामाजिक लष्करी क्षमता अधोरेखित करतात. पश्चिम घाट तथा सह्याद्री पर्वत दोन जुलै 2012 रोजी युनेस्कोने जागतिक नैसर्गिक वारसा स्थळ म्हणून घोषित केला. जैवविविधता असलेले महत्त्वाचे नैसर्गिक अधिवास ज्यांना वैज्ञानिक किंवा संवर्धनाच्या दृष्टीने वैश्विक मूल्य

आहे. प्रस्तुत शोधनिबंधात नैसर्गिक वारसा स्थळ या प्रकारातील पश्चिमी घाट Western Ghat. याचा अभ्यास करण्यात आला आहे

पश्चिम घाटाची उत्पत्ती. सह्याद्री पर्वतरांगा चा उल्लेख प्राचीन काळापासून प्राचीन वाङ्मयात दिसतो. रामायण, महाभारत यामध्ये या परिसराला विविध नावाने संबोधले आहे. 150 दशलक्ष वर्षांपूर्वी गोंडवण भूमी या महाखंडाचे विभाजन झाले. यातून भारतीय द्वीपकल्प निर्माण झाले. नियामी विद्यापीठातील भूगर्भ शास्त्रज्ञ बॅरन व हरिसन यांच्या सिद्धांतानुसार100 ते 80 दशलक्ष वर्षांपूर्वी आफ्रिकेतील मादागास्कर पासून भारतीय भूखंड विलग झाला व पश्चिम किनारा अस्तित्वात आला. सुमारे 65 दशलक्ष वर्षांपूर्वी ज्वालामुखीचा प्रचंड उद्रेक होऊन दक्षिण ट्रॅप डेक्कन ट्रॅप ची निर्मिती झाली असावी. या लावा रसापासून बेसॉल्ट खडकाची विस्तृत प्रमाणामध्ये मध्य भारताचा भाग याने व्यापला. या खडकाचे थर तीन किलोमीटर खोलीपर्यंत आढळतात. बेसॉल्ट खडका सोबत नॉकाइट, खोंडेलाइट, लेप्टिनाइट, रूपांतरित पट्टिताश्म, स्फटिकमय चुनखडक, लोहखनिज, डोलेराइट व ॲनॉर्थाइट हे खडकही या भागात आढळतात. दक्षिणेकडील टेकडयांमध्ये जांभा खडक व बॉक्साइट खनिज आढळते. भूगर्भातील नैसर्गिक उद्रेकामुळे लावारसापासून बनलेल्या कातळावर महाराष्ट्र वसलेला आहे. हा डेक्कन ट्रॅप उत्तर  भारताला व दक्षिण भारताला जोडणारा आहे. या पर्वताची निर्मिती प्रस्तरभंगातून निर्माण झालेल्या बेसॉल्ट खडकापासून झाली आहे. प्रस्तरभंग होऊन पश्चिमेकडील भाग खाली खचला व उत्तुंग अशा पर्वतरांगाची निर्मिती झाली. या पर्वतरांगाची दक्षिण उत्तर लांबी सुमारे 1600 किलोमीटर आहे.. याची महाराष्ट्रातील लांबी 440 किलोमीटर आहे. याच पर्वतरांगेत असलेले कळसुबाई हे शिखर 1646 मीटर उंचीचे आहे.  पश्चिम भारतातील पर्वत किंवा टेकड्यांची उत्तर-दक्षिण दिशेने पसरलेली रांग जी अरबी समुद्राच्या मलबार किनाऱ्याला समांतर गुजरात, महाराष्ट्र, गोवा, कर्नाटक, तामिळनाडू आणि केरळ या राज्यांमधून जातात.

दख्खन पठाराचा पूर्वेकडील भाग आणखी एका घाटाने, पूर्व घाटाने बनवला आहे. महाबळेश्वर हे टेकडीवरील ठिकाण हे लॅटेराइट पठारावर वसलेले आहे. हे पर्वतरांगांच्या उत्तरेकडील भागातील सर्वात उंच पर्वतांपैकी एक आहे, जे 4700 फूट पर्यंत उंच आहे. उत्तरेकडील पर्वतांची उंची 3000 ते 5000 फूट) पर्यंत पोहोचते परंतु गोव्याच्या दक्षिणेकडील भागात ते 3000 फूटांपेक्षा कमी उंच आहे. तथापि, ते पुन्हा दक्षिणेकडील भागात उंच आहेत, येथे नीलगिरी टेकड्या आढळतात, ज्यांचे सर्वोच्च शिखर, दोडा बेट्टा 8652 फूट आणि अण्णामलाई पालनी आणि निलगिरी पर्वतरांगा आहेत, ज्या तिन्ही पश्चिम घाटातील सर्वात उंच शिखर, अनै शिखर अनैमुडी, 8842 फूट सह्याद्रीचे उत्तर सह्याद्री व दक्षिण सह्याद्री असे दोन भाग पडतात. उत्तरेस तापी नदीपासून दक्षिणेस निलगिरी पर्वत पुंजापर्यंतची श्रेणी उत्तर सह्याद्री व तेथून प्रामुख्याने पालघाट खिंडीपासूनची (खंड) दक्षिणेकडील पर्वतश्रेणी दक्षिण सह्याद्री म्हणून ओळखली जाते. पालघाट खिंडीमुळे सह्यादीची सलगता खंडित झालीआहे.

प्रमुख नद्यांची उगमस्थान. नद्या - विशेषतः पवित्र कृष्णा गोदावरी आणि कावेरी नद्या - यांचे उगमस्थान पश्चिम घाटात आहे. पर्वत अचानक पश्चिमेकडील सागरी मैदानाकडे उतरत असल्याने, सैद्धांतिकदृष्ट्या ते धरणांना उंच उतारावरून वाहणाऱ्या पाण्याचा वापर करण्यास अनुकूल असले पाहिजेत. तथापि, शिखरावर उगवणाऱ्या नद्यांमध्ये हिवाळ्यात प्रवाहाचे प्रमाण कमी असते. तरीही, पश्चिम घाटातील काही नद्यांना वीज निर्मितीसाठी बांधण्यात आले आहेत. नाशिक जिल्ह्यातील त्र्यंबकेश्वर येथे गोदावरी ही नदी ,पुणे जिल्ह्यातील भीमाशंकर येथे भीमा ही नदी, तसेच सातारा जिल्ह्यातील महाबळेश्वर येथे येथील कृष्णा व कोयना नद्या उगम पावतात. कोकणातील अनेक नद्यांचे उगम स्थान हे सह्याद्री पर्वतच आहे.पश्चिम घाटातील नद्या. बंगालच्या उपसागराला व अरबी समुद्राला मिळणाऱ्या अनुक्रमे पूर्ववाहिनी व पश्चिम वाहिनी नद्यांचा पश्चिम घाट जलविभाजक आहे. बंगालच्या उपसागराला मिळणाऱ्या बहुतांशी नद्या सह्याद्रीच्या घाटमाथ्यातूनउगम पावतात या नद्यांमध्ये

प्रमुख नद्या सोबतच महाराष्ट्रातील महत्त्वपूर्ण अशा गिरणा, दारणा ,मुळा ,प्रवरा, वारणा, कोयना यांचाही समावेश होतो. महाराष्ट्रासोबतच कर्नाटक राज्यातून देखील घटप्रभा, मलप्रभा, तुंगभद्रा, या कृष्णा नदीच्या उपनद्यांचा उगम सह्याद्रीच्या घाटमाथ्यातून होतो. तसेच तामिळनाडू राज्यात पूर्वेकडे वाहणाऱ्या महत्त्वपूर्ण वैगयी नदी चित्तार व ताम्रपर्णी या नद्याचे उगम स्थान पश्चिम घाटामध्ये आहे केरळ मधील चलाकुडी, पेरियार, कलर, यांचेही उगमस्थान पश्चिम घाट आहे. या पूर्व वाहिनी नद्या सोबतच अरबी समुद्राला मिळणाऱ्या पश्चिम वाहिनी नद्या मोठ्या प्रमाणात आहेत. यांची लांबी अतिशय कमी आहे यात दमणगंगा, सूर्य, तानसा, सावित्री, तेरखोल, वशिष्ठी, गोव्यातील मांडवी यांचा समावेश होतो, पश्चिम घाटाच्या प्रचंड अशा उंचीमुळे नद्या अतिशय वेगाने वाहत उंच कड्यावरून खाली कोसळत असतात. त्यामुळे पश्चिम घाटामध्ये अनेक धबधब्याची निर्मिती आपल्याला पाहता येते. कर्नाटकातील शरावती नदीवरील जोग धबधबा. कावेरी नदीवरील शिवसमुद्रम हे महत्त्वाचे आहेत. या पश्चिमी घाटात निर्माण होणाऱ्या नद्यावर अनेक धरणांची निर्मिती झाली आहे. जलविद्युत केंद्र निर्माण झाले. यात महाराष्ट्रातील कोयना, कर्नाटकातील तुंगभद्रा,केरळमधीलपिरंबीकुलम,धरणेविशेषमहत्त्वाची,आहे.

पश्चिम घाटाची लक्षणीय मान्सून प्रणाली: भारताच्या मान्सून हवामान पद्धतीत ते मोठी भूमिका बजावतात. पश्चिम घाटातील उंच पर्वतीय श्रंखला भारतीय मानसून हवामान प्रणालीवर प्रभाव टाकते. नैऋत्य मोसमी कक्षेत पश्चिम घाट येत असल्यामुळे इथे घाटमाथा आणि पश्चिम उतारावर मोठ्या प्रमाणात पाऊस पडतो वार्षिक सरासरी पर्जन्यमान 300 ते 400 सेंटीमीटर आहे काही ठिकाणी ते 900 सेंटीमीटर पर्यंत आहे. पश्चिम घाटाच्या पूर्वेकडील उतार पर्जन्यछायाच्या कक्षेमध्ये येत असल्यामुळे येथील पावसाचे प्रमाण अत्यंत कमी आहे.

ज्यामुळे अरुंद पश्चिम किनाऱ्यावर उष्णकटिबंधीय मान्सून हवामान तयार होते आणि दख्खनला लक्षणीय पर्जन्यवृष्टीपासून वंचित ठेवते. सुरुवातीच्या मान्सूनच्या वाऱ्यांचा प्रवाह पर्वतांच्या उतारांवर साचतो आणि नंतर पुन्हा मोठ्या उंचीवर जमा होण्यापूर्वी मागे

सरकतो.वाढत्या प्रमाणात दाट ढग वरच्या दिशेने ढकलले जातात. जोपर्यंत वारा आणि ढग अडथळा ओलांडून जात नाहीत आणि कोरड्या अंतर्देशीय हवेने काही क्षण शोषून घेतल्यानंतर, ते आतील भागात वाहतात. पश्चिम घाट हे पृथ्वीवरील मान्सून प्रणालीचे सर्वोत्तमउदाहरणआहे.

जैवविविधता : जगातील इतर कोणत्याही ठिकाणी न आढळणारी विषुववृत्तीय उष्ण कटिबंधीय सदाहरित जंगले येथे पाहायला मिळतात. महाराष्ट्रासाठी सह्याद्रीचा हा जागतिक वारसा हा विशेष महत्त्वाचा आहे. या वारसा अंतर्गत कोयना चांदोली राधानगरी कास पठार या महत्वाच्या क्षेत्राचा समावेश आहे जैविकदृष्ट्या समृद्ध युनेस्कोच्या जागतिक वारसा स्थळ आहे.

पारिस्थितीकीयदृष्टया पश्र्चिम घाटालाविशेष महत्त्व आहे. जैवविविधतेच्या दृष्टीने हा संपूर्ण परिसर अतिशय समृद्ध आहे. ब्राझील मधील रियो दि जनरिओ येथे झालेल्या जागतिक वसुंधरा परिषदेमध्ये पश्चिम घाटाची नोंद जगातील 18 अति संवेदनशील हॉटस्पॉट अशा पर्यावरणीय क्षेत्रामध्ये करण्यात आली.अनेक जातींचे प्राणी, पक्षी व असंख्य प्रकारच्या वनस्पती येथे आढळतात. जगातील समृद्ध जैवविविधता असलेल्या प्रदेशात पश्चिम घाटाचा आठवा क्रमांक लागतो. पारिस्थितीकी वैज्ञानिक नॉर्मन मेअर्स यांच्या प्रयत्नांमुळे १९८८ मध्ये पश्र्चिम घाट परिसर पारिस्थितीकीयदृष्टया अतिसंवेदनशील प्रदेश म्हणून घोषित करण्यात आला. भारताच्या क्षेत्रफळाच्या केवळ ५% भूमी या प्रदेशाने व्यापली असली तरी भारतातील उच्च दर्जाच्या २७% वनस्पती येथे आढळतात. त्यांपैकी १,८०० जातींच्या वनस्पती केवळ याच प्रदेशात पाहावयास मिळतात. 2000 जातींच्या औषधी वनस्पती इथे आढळतात. बॉम्बे नॅचरल हिस्टरी सोसायटी च्या अभ्यासानुसार सह्याद्री प्रदेशात देवतांच्या नावाने संरक्षित असलेल्या 1600 पेक्षा जास्त देवराया आहेत. यामुळेच वन्य प्राणी अभयारण्य व संरक्षित जंगल अस्तित्वात आहेत. येथील जंगलातून लागवड व इतर अनेक वन उत्पादने चहा कॉफी रबर मसाल्याचे पदार्थ रानमेवा अनेक प्रकारचे फळे

इत्यादी उत्पन्न उत्पादने मिळतात. त्यामुळे या वनस्पती म्हणजे या प्रदेशाची वैशिष्टये बनली आहेत. सुमारे पाच हजारांवर फुलझाडांच्या जाती पश्र्चिम घाट परिसरात असून सदाहरित, पाणगळीचे वने तसेच इतर अनेक दुर्मिळ प्रजाती,जगामध्ये कुठेही न आढळणारे 1600 फुलांचे प्रकार पश्चिम घाटातील कास पठारावर पहावयास मिळतात. हे पठार अनेक दुर्मिळ फुलांच्या प्रजातीसाठी पोषक आहे.

वन्य प्राणी. प्राणी जीवनाच्या बाबतीत पश्चिम घाटामध्ये काही मोठे वन्यजीव आढळतात. त्यात महत्त्वाचे महाराष्ट्र, कर्नाटक, आणि तमिळनाडू या सह्याद्रीच्या पर्वतरांगांमध्ये आशियाई हत्ती, इंडियन बायसन रानगवा, पट्टेदार वाघ व विविध प्रकारच्या माकडांच्या प्रजातीसाठी हे महत्त्वाचे निवासस्थान आहे. सरपटणारे प्राणी व उभयचर प्राण्यांमध्ये विविधता येथे आढळते. गोड्या पाण्यातील माशांच्या अनेक प्रजाती पश्चिम घाटातील नद्यांमध्ये आढळतात.

पश्चिम घाटाच्या संवर्धन भारत सरकारने 2011 मध्ये माधव गाडगीळ आणि 2013 मध्ये कस्तुरी रंगन यांची समिती गठीत केली. पश्चिम घाटातील काही क्षेत्र जागतिक वारसा स्थळ घोषित केल्यामुळे या भागाला आंतरराष्ट्रीय स्तरावर संवर्धन कार्यक्रम राबवल्या जात आहे. माधव गाडगीळ व के कस्तुरी रंग न अहवालातून देखील या परिसराच्या संवर्धनासाठी विविध उपाय योजना सुचवल्या आहेत. या अंतर्गत व इतर सरकारी योजनातून वन आणि वन्यजीवांचे संरक्षण. व्याघ्र प्रकल्प संरक्षण आणि संवर्धन होत आहे.

निष्कर्ष.

महाराष्ट्रातील नैसर्गिक वारसा स्थळ म्हणून मान्यता प्राप्त पश्चिम घाट अथवा सह्याद्री पर्वतरांग ही जैवविविधतेचा खरा खजिना आहे. पर्यावरणीय, हवामानिक, आर्थिक आणि सांस्कृतिक दृष्टीनेही अत्यंत महत्त्वपूर्ण आहे. पश्चिम घाटातील अद्वितीय वनस्पती, प्राणी,

औषधी वनस्पती, दुर्मिळ फुलांचे प्रकार, उष्णकटिबंधीय सदाहरित जंगले तसेच अनेक नद्यांची उगमस्थाने यामुळे या परिसंस्थेचे वैश्विक महत्त्व अधोरेखित होते. वाढता मानवी हस्तक्षेप, अतिक्रमण, खनन, जंगलतोड, हवामान बदल आणि जलस्रोतांवरील दबाव यामुळे हा संपूर्ण परिसर धोक्यात आला आहे. एकूणच पाहता, पश्चिम घाट हा महाराष्ट्राचा तसेच भारताचा अमूल्य नैसर्गिक वारसा आहे. या पर्वतरांगेचे संरक्षण करणे ही केवळ पर्यावरणीय गरज नसून संपूर्ण मानवजातीची सामूहिक जबाबदारी आहे. शाश्वत विकास, संरक्षित क्षेत्रांचे काटेकोर व्यवस्थापन, वन्यजीवांचे संरक्षण, स्थानिक समुदायांचा सहभाग आणि पर्यावरणपूरक पर्यटन ही या प्रदेशाच्या भविष्यासाठी अनिवार्य घटक आहेत. एकूणच पाहता, पश्चिम घाट हा महाराष्ट्राचा तसेच भारताचा अमूल्य नैसर्गिक वारसा आहे. या पर्वतरांगेचे संरक्षण करणे ही केवळ पर्यावरणीय गरज नसून संपूर्ण मानवजातीची सामूहिक जबाबदारी आहे. यातील जैवविविधता, नद्या, जंगल आणि परिसंस्था यांचे जतन केल्यासच पुढील पिढ्यांसाठी हा अनोखा नैसर्गिक ठेवा सुरक्षित राहू शकेल.

संदर्भ सूची *

1. Unesco world heritage centre. https://whc.unesco.org

2.प्रा. घाणेकर प्र. के. कोकणातील पर्यटन, स्नेहल प्रकाशन पुणे 1995

3. लाड आर . कोकणातील कातळ शिल्पे आणि सिंधू संस्कृती. पितो री माया प्रकाशन मुंबई.

4. Radha Nagari wildlife sanctuary projected area Maharashtra forest department report.

5.कर्वे ची. ग. संपादक महाराष्ट्र परिचय, प्रसाद प्रकाशन, पुणे.

6.शिवस्वरूप सहाय, पर्यटन का देश, विद्याविहार नई दिल्ली 2009.

7.सवदी ए. बी. कोळेकर पी. एस. आधुनिक भूगोल प्रगती बुक्स प्रा . लि. पुणे

8.भालेराव. श.म. संपादक Encyclopaedia of Indian Rivers भारतीय सरिता कोश खंड डायमंड पब्लिकेशन्स.पुणे

9.श्री पडळकर व्ही व्ही, डॉ. गटारी डी. जी. Tourist Attraction in Radhanagari wildlife sanctuary of Kolhapur district. Maharashtra Variorum multi disciplinary e-researchernal vol. O2_II4